# स्मार्ट कॉटन अंतर्गत शेतकऱ्यांना मार्केटिंग व्यवस्थापनाचे धडे

**लोकशाही वार्ता / नागपूर**

बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पांतर्गत शेतकऱ्यांना स्वच्छ कापूस वेचणीबाबतचे प्रशिक्षण देण्यात येत आहे. यासोबतच आता शेतकऱ्यांना मार्केटिंग व्यवस्थापन विषयावरही मार्गदर्शन कार्यशाळेच्या माध्यमातून करण्यात येत आहे.



नुकतेच स्मार्ट कॉटन अंतर्गत सावनेर तालुक्यातील बडेगाव, ढकारा, खुबाळा आदी गावातील शेतकऱ्यांसाठी वेचणी पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. याप्रसंगी जिल्हा स्मार्ट कॉटनचे नोडल अधिकारी अरविंद उपरीकर, तांत्रिक अधिकारी उमेश देवीकर, रवी धकाते, नितीन दीक्षित, सावनेर तालुका कृषी अधिकारी शुभांगी राठोड, कृषी पर्यवेक्षक कुरळकर, धोटे, पवार, कस्तुरे, काटेखाये आदी उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्यावतीने शेतकऱ्यांना स्वच्छ कापूस वेचणी व स्मार्ट कॉटन अंतर्गत मार्केटिंग व्यवस्था विषय सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

यू.डी. देवीकर यांनी शेतकऱ्यांना कापसाच्या गुणवत्तेचे गुणधर्म, लांबी, मजबुती, मुलायमता, परिपक्वता, रंग, जिनिंग टक्केवारी, ओलावा आणि कचरा यांचे महत्त्व कापसाच्या बाजारमूल्येवर अत्यंत प्रभावशाली आहेत याबद्दल मार्गदर्शन केले. धकाते यांनी कापसाची वेचणी करताना घ्यावयाची काळजी सोबतच शेतापासून घरी आणि घरापासून जिनिंग पर्यंत गुणवत्ता राखण्यासाठी काय काळजी घ्यावी याबद्दल मार्गदर्शन केले. या कार्यशाळेत परिसरातील शेकडो शेतकरी सहभागी झाले होते.